माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १४७३/२०२२**

**अपिलार्थी, श्री. शेखर घनश्याम जनबंधू**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, कक्ष-१०**
प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, वनभवन, नागपूर

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन),**
प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, वनभवन, नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २८.०८.२०२३**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर सत्यमेव जयते

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०६.१२.२०२१ | १६.१२.२०२१ | ०४.०५.२०२२ | २७.०५.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०६.१२.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " १) वन कर्मचारी कर्तव्यावर असताना त्याचा किंवा कर्तव्य बजावताना त्याच्या मृत्यु झाल्यास त्याचा कोणकोणत्या स्वरुपात व किती कालावधीच्या आत मोबदला देण्यात यावा त्या शासकिय निर्देश शासन निर्णयाची साक्षांकित प्रत " इत्यादी एकुण तीन मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कक्ष-१०, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दिनांक १६.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीस एकुण ९ पृष्ठांची माहिती तसेच मुद्देनिहाय यावर मुद्दा क्रं. १ ते ३ यावर देखील कलम २ (च) प्रमाणे प्रदान करण्यात आली आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०४.०५.२०२२** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे “मुद्दा क्रं. १ व २ ची माहिती अपुर्ण व दिशाभुल करणारी आहे” असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७.०५.२०२२ रोजी सुनावणी घेवून, मुद्दा क्रं. २ बाबत मागितलेली माहिती या कार्यालयाचे स्तरावर उपलब्ध नसल्याने, अपिलार्थी यांनी सदरची माहिती वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांचे कार्यालय स्तरावरुन उपलब्ध करुन घ्यावी. तसेच मुद्दा क्रं. ३ ची शासनाकडून प्राप्त झालेली माहिती जन माहिती अधिकारी, कक्ष-१० यांनी अपिलार्थी यांना विनामुल्य पुरवावी

व नमुद ३ मुद्याच्या अनुषंगाने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कक्ष-१० यांनी पुरविलेली असल्याने, अपील निकाली काढण्यात येत आहे, असे आदेशीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०८.०६.२०२२** रोजी "मागितलेली माहिती पुर्णपणे चुकीची व दिशाभुल करणारी आहे" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक **२८.०८.२०२३** रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा **कार्यालय अधिक्षक, कक्ष-१०** श्री. नितीन झाडे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा **उपवनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन)** श्रीमती गिन्नी सिंह उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एकुण ९ पृष्ठांची माहिती तसेच मुद्देनिहाय यावर मुद्दा क्रं. १ ते ३ यावर देखील कलम २ (च) प्रमाणे प्रदान करण्यात आली असुन ती खालील प्रमाणे आहे.

१. (अ) गट अ/ब/क/ड मधील शासकीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्यास नक्षलवादी/आतंकवादी/ दरोडेखोर/ समाज विघातक यांच्या हल्ल्यात/कारवाईत मृत्यु आल्यास अथवा शासन सेवेत कार्यरत असतांना स्वत:चा जीव धोक्यात घालुन प्रत्यक्ष कर्तव्या बजावतांना मृत्युमुखी पडल्यास अशा अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयातील, पात्र व्यक्तीस, अनुकंपा तत्वावर नियुक्ती देतांना, त्यांचे नाव प्रतिक्षासुचीमध्ये न घेता रिक्त पदांच्या मर्यादेची अट शिथील करुन त्यांना सर्व प्राथम्याने अनुकंपा नियुक्ती देण्याबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय दिनांक २१.०९.२०१७ मध्ये परिशिष्ट-अ मधील २(ब) मध्ये नमुद आहे. सदर शासन निर्णय हा maharashtra.gov.in या वेबसाईट वर उपलब्ध असुन त्याचा संकेतांक २०१७०९२११५०८४८५२०७ आहे.

(ब) महाराष्ट्र राज्य वन कर्मचारी कल्याण निधी योजना महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक क्रं. एफएसटी १३०५/प्र.क्र.४४८/फ-४ दिनांक ०९/०८/२००६ अन्वये वन व सामाजीक वनीकरण विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता लागु करण्यात आलेली असुन त्याबाबतचे प्रसिध्दी पत्रकाची प्रत सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे.

२. बेलारा वनपरिक्षेत्र जिल्हा चंद्रपूर येथे वाघिणिच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या कु. स्वाती ढुमने या महिला वनरक्षकास या कार्यालयाच्या स्तरावरुन मोबदला देण्यात आलेला नसल्याने या कार्यालयाच्या स्तरावर सदर माहिती उपलब्ध नाही.

३. नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील ४ नंबर बिटातील कक्ष क्रं. ९८,९९, कपाळदेव बिटातील कक्ष क्रं. ९७ आणि पिटेझरी बिटातील कक्ष क्रं. १०० मध्ये आग विझवतांना होरपळुन मृत्यु पावलेल्या स्व. श्री. सचिन अशोक श्रीरंग, विजय तिजाब मसकोल्हे, टेकचंद गोपीचंद राणे आणि राकेश युवराज मडावी हंगामी मजुरांचे बाबत या कार्यालयाकडे उपलब्ध अभिलेखानुसार शासनास सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांच्या अग्रेषणपत्राच्या साक्षांकीत प्रति यासह सहपत्रीत करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★नागपूर★ सत्यमेव जयते

पुरविण्यात आलेली माहिती अपुर्ण व दिशाभुल करणारी असुन नियमावलीच्या प्रती तसेच मुद्दा क्रं. १ ते २ ची माहिती ही चुकीची असल्याचा आक्षेप नोंदवित अपिलार्थी यांनी दिनांक ०४.०५.२०२२ रोजी अपील अर्ज दाखल केला असुन त्यावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन) यांनी सुनावणी घेवून आदेश पारित केलेले आहे. यात दिनांक २७.०५.२०२२ रोजीच्या आदेशात तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी याआधीच माहिती दिली असल्या व्यतिरिक्त मुद्दा क्रं. १ च्या संदर्भात तसेच मुद्दा क्रं. १ ते ३ याबाबत, अपिलार्थी यांचे दिनांक ०४.०५.२०२२ रोजीचे प्रथम अपील अर्जावर तसेच दिनांक ०६.१२.२०२१ रोजीचे माहिती अधिकार अर्जात नमुद ३ मुद्यांवर खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली.

a) वन कर्मचारी कर्तव्यावर असतांना त्याचा किंवा कर्तव्य बजावतांना त्याचा मृत्यु झाल्यास त्याला कोणकोणत्या स्वरुपात व किती कालावधीच्या आत मोबदला देण्यात यावा त्या शासकिय निर्देश / शासन निर्णयाची साक्षांकित प्रत उपलब्ध करुन देणेस अपिलकार यांना सुनावणी दरम्यान विनंती केली. त्यावर "कोणत्याही शासकीय कर्मचारी कर्तव्यावर असतांना मृत्यु झाल्यास त्याच्या वारसाला अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत शासन निर्णय अस्तित्वात आहे. तसेच महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रं. एफएसटी-१३०५/प्र.क्रं./४४८/फ-४, दिनांक ०९.०८.२००६ अन्वये वन व सामाजिक वनीकरण विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्याकरीता महाराष्ट्र राज्य वन कर्मचारी कल्याण निधी योजना सुरु करण्यात आली असुन त्याचा लाभ सुध्दा मृत व्यक्तीचे कुटूंबियांना दिल्या जातो मात्र हंगामी व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बाबत असा कोणताही शासन निर्देश / आदेश अस्तित्वात नसल्याचे" सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी, कक्ष-१० यांनी अवगत केले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी असेही अवगत केले की, महाराष्ट्र शासनाचा या हंगामी / कंत्राटी कामगारांच्या बाबत कोणताही शासन निर्णय नसला तरी कामगारांच्या बाबत असा प्रसंग घडल्यास Employee Compensation Act, १९२३ नुसार कामगारांना मोबदला देण्याची तरतूद आहे. तरी सदर Employee Compensation Act, १९२३ या कायदयाची प्रत अपिलकार यांनी शासकीय मुद्रणालय, नागपूर अथवा कोणत्याही खाजगी पुस्तकालयातून स्वत: उपलब्ध करुन घ्यावी.

b) अपिलकार यांनी सुनावणी दरम्यान मुद्दा उपस्थित केला की, कोलारा वनपरिक्षेत्र जिल्हा ताडोबा येथे वाघीणीच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या कु. स्वाती ढुमने या महिला वनरक्षकास या कार्यालयाचे स्तरावरुन काय मोबदला देण्यात आला ? त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले की, सदर प्रकरणी या कार्यालयाचे स्तरावरुन कोणताही मोबदला मृत महिला वनरक्षकांचे कुटूंबियास देण्यात आला नाही. मात्र मृत वनरक्षक कु. स्वाती ढुमने यांचे पतीस तात्पुरत्या स्वरुपात नौकरी तसेच ताडोबा-अंधारी व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान चंद्रपूर यांचे मार्फत तसेच काही मोबदला देण्यात आलेला आहे. सदरचा मोबदला किती प्रमाणात दिला आहे याची माहिती व आवश्यक कागदपत्रे ही वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांचे कार्यालय स्तरावरुन उपलब्ध होतील असे अपिलकार यांना सुनावणी दरम्यान अवगत केले.

तसेच वनसंरक्षणाचे कर्तव्य पार पाडतांना कोणत्याही वन अधिकारी / कर्मचारी यांचा मृत्यु झाल्यास अथवा ते कायम अपंग झाल्यास अशा बाधित अधिकारी / कर्मचारी यांना किंवा त्यांचे नातेवाईकांना नुकसान भरपाई देणेबाबत पोलीस विभागाचे कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधांचे धर्तीवर वन कार्यालयाचे पत्र क्रं. कक्ष-१०(२)/एक/प्रस्ताव/प्र.क्रं.९/२१-२२/४०, दिनांक १८.०५.२०२१ अन्वये प्रस्ताव शासनास सादर

करण्यात आला असुन, सदरचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन असल्याचे जन माहिती अधिकारी, कक्ष-१० यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले.

c) अपिलकार यांचे दिनांक ०६.१२.२०२१ रोजीचे माहिती अधिकारातील मागितलेल्या मुद्दा क्रं. ३ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र क्रं. कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.५६/२१-२२/१४३२, दिनांक १६.१२.२०२१ अन्वये त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध अभिलेखानुसार शासनास सादर केलेल्या प्रस्तावांच्या प्रती अपिलकार यांना पुरविलेल्या आहेत. आता सदर प्रकरणाबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही झालेली असुन त्याच्या प्रती जन माहिती अधिकारी, कक्ष-१० यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत असे त्यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले.

आता पर्यंत अतिरीक्त प्रतिसाद दिला असुन डॉ. कुमारस्वामी एस. आर. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन), नागपूर यांनी मुद्दा क्रं. २ बाबत मागितलेली माहिती ही यांच्या कार्यालयाच्या स्तरावर उपलब्ध नसल्याने अपिलार्थी यांनी सदरची माहिती वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांचे कार्यालय स्तरावरुन उपलब्ध करुन घ्यावी. तसेच अपिलार्थी यांचे दिनांक ०६.१२.२०२१ रोजीच्या माहिती अधिकार अर्जातील मुद्दा क्रं. ३ बाबत शासनाकडून प्राप्त झालेली माहिती ही जन माहिती अधिकारी, कक्ष-१० यांनी अपिलार्थीस विनामुल्य पुरवावी व उर्वरीत माहिती याआधीच विनामुल्य प्रदान केली असल्याची बाब लक्षात घेता, वरील अपील अर्ज निकाली काढण्यात आला आहे. त्याविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक ०८.०६.२०२२ रोजी द्वितीय अपील अर्ज दाखल केला असुन, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अयोग्य आदेश पारित केलेल्या आदेशाचे तसेच जन माहिती अधिकारी स्तरावर माहिती ही अपूर्ण व दिशाभुल करणारी असल्याचा आक्षेप नोंदवित योग्य ते आदेश पारित करण्याची आग्रही विनंती केली आहे.

आज झालेल्या सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केल्यानुसार ४ हंगामी वन मजुरांचा घोरपळुन मृत्यु झाला असुन त्यांना शासनाकडुन अतिरीक्त मोबदला मिळण्याबाबत तसेच विषेश बाब म्हणून शासकीय नोकरी देण्यासंबधी कुठलाच निर्णय घेण्यात आला नसुन शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनानुसार ६० दिवसा पेक्षा जास्त १ वर्षात ६० दिवसा पेक्षा जास्त हंगामी वनमजुर अथवा शासकीय कर्मचाऱ्यांना मिळणारा मोबदला कथीत मोबदला देण्याबाबत तरतुद असल्याची व ती तरतुद प्रस्तुत प्रकरणात वन विभागाने डावल्याचा आक्षेप त्यांनी नोंदविला आहे. या उलट विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११.०३.२०२२, दिनांक १८.०४.२०२२ व दिनांक २९.०३.२०२२ या रोजी शासनाच्या वतीने वरील चारही हंगामी रोजंदारी कुटूंबियांना शासकीय नौकरी देण्याबाबतचा प्रस्ताव हा शासन निर्णय दिनांक २१.०९.२०१७ रोजीचा हवाला देत शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या गट-क व गट-ड सवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटूंबियांनाच अनुकंपा तत्वावर अनुज्ञेय राहील अशी तरतुद आहे. तथापि, वरील चारही मृत हंगामी रोजंदारी मजुर म्हणून कामावर असल्याने त्यांच्या कुटूंबियांना अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत नियुक्ती अनुज्ञेय नाही, तसेच अनुकंपा योजनेमध्ये विशेष बाब म्हणून शासकीय सेवेत सामावून घेण्याची तरतूद नसल्याचे सुस्पष्टपणे कळविले असुन या पत्राची प्रत अपिलार्थीस दिनांक १०.०८.२०२२ रोजी प्रदान करण्यात आले आहे. ही बाब लक्षात घेता, अपिलार्थी यांच्या मौखिक युक्तीवादात केलेल्या दोन मुद्याविषयी म्हणजेच मुद्दा क्रं. २ बाबत बेलारा वनपरिक्षेत्र जिल्हा चंद्रपूर येथे वाघिणीच्या

हल्ल्यात मृत्युमुखी पडलेला कु. स्वाती ढुमने या महिला वनरक्षंकास शासकीय नियमानुसार किती मोबदला प्रदान करण्यात आला याबाबतची माहिती वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक ताडोबा-अंधारी प्रकल्प चंद्रपूर यांच्या कार्यालयातुन प्राप्त करुन ते अपिलार्थीस विनामुल्य प्रदान करावी. अपिलार्थी यांनी घेतलेला दुसरा आक्षेप म्हणजे Employee Compensation कायदा, १९२३ मध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दिनांक २७.०५.२०२२ रोजी दिलेल्या प्रकरणातील दखल लक्षात घेता, याबाबत या कायद्याची प्रत अपिलार्थी यांनी शासकीय मुद्रणालय, नागपूर अथवा कोणत्याही खाजगी पुस्तकालयातून स्वत: उपलब्ध करुन घ्यावी. या अनुषंगाने प्रस्तुत कायद्याची प्रत महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर व इतर अंतर्गत कायद्या विषयक बाबतच्या संकेतस्थळावर विनामुल्य उपलब्ध असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७.०५.२०२२ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्रं. १ मध्ये नमुद केलेल्या आदेशात अंशत: बदल करुन सदरची माहिती ही जन माहिती अधिकारी यांनी वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक ताडोबा-अंधारी प्रकल्प चंद्रपूर यांच्या कार्यालयातुन प्राप्त करुन घ्यावी.

या प्रकरणात अपिलार्थी यांना याआधीच वन विभागाने सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने, प्रचलित नियमानुसार शासकीय धोरणाचे गांर्भीय लक्षात घेता, प्रधान मुख्य वनसंरक्षक अथवा त्यांचे अधिनिस्त जबाबदार अधिकारी / अधिकाऱ्यांनी योग्य तो निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्याच्या सुचनेसह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★नागपूर★ सत्यमेव जयते

(राहुल भा.पांडे)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २८.०८.२०२३**

25 OCT 2023

जावक क्रमांक 6008 ---- दिनांक -------------------------